Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 9, Oct 2012
ISSN:-2230-7850

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

# तुकारामांचे पाईक अभंग : एक विचार

*संभाजी मलघे*

इंद्रायणी महाविद्यालय तळेगाव दाभाडे

**सारांश :**

तुकोबांच्या गाथेतील 1062 ते 1072 या क्रमांकाचे अभंग पाईकाचे अभंग म्हणून प्रसिध्द आहेत. 'पाईक' या शब्दाचा अर्थ शूर शिपाई, सेवक किंवा वीर पुरूष. जीवनात शूर वृत्ती महत्वाची असते. किंबहुना जीवनाच्या विविध क्षेत्रात पाईकपणे वागणे किती आवश्यक असते हे तुकोबांनी या अभंगामधून सांगितले आहे.

**प्रस्तावनाः**

राजकारण, समाजकारण, देश संरक्षण, विद्यासंपादन किंवा परमेश्वर प्राप्तीसाठी साधना या सर्व क्षेत्रात मनुष्याचे पाईक–शूर असणे महत्वाचे असते. तुकोबांनी पाईकांचे अभंग रचले त्या निर्मीतीचा प्रसंग देखील सांगितला जातो. एकदा छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे शूर वीर तुकोबांचे कीर्तन ऐकत बसले होते. या स्वराज्यसाधकांना बोध व्हावा असे तुकोबांच्या मनात आले आणि तद्प्रसंगी पाईकांच्या अभंगाची निर्मीती झाली. रणांगणात शत्रूशी लढताना जीवावर उदार होऊन धैर्याने लढण्याची शूर वृत्ती जरूरीची असते. परमार्थाच्या किंवा इतरही क्षेत्रात या वृत्तीला अत्यंत महत्त्व असते. हे तुकोबांना पाईकाच्या अभंगामधून व्यक्त करायचे आहे.

**पाईकाचे अभंग**

तुकोबांनी रचलेल्या पाईकाच्या अभंगामधून शूर सेवका विषयी विचार मांडले आहेत. काही महत्वाच्या अभंगांचे दाखले देऊन या ठिकाणी त्यांच्या अभंगावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

पाईकपणे जोतिला सिध्दांत। शूर धरी मात वचन चित्तीं ।1।
पाईकावाचून नव्हे कधी सुख। प्रजांमध्ये दुःख न सरे पीडा ।2।
तरी व्हावे पाईक जिवाचे उदार। सकल त्यांचा भार स्वामी वाहे ।3।
पाईकाचे सुख जया नाही ठावे। धिग त्यांनी ज्यांचे वायांविण ।4।
तुका म्हणे एका क्षणाचा करार। पाईक अपार सुख भोगी ।5।

सेवक झाल्याशिवाय त्याचे सुख कळणार नाही. सेवकाशिवाय प्रजेचे दुःख त्यांची पीडा दूर होणार नाही. म्हणून जीवावर उदार होऊन सेवक व्हावे, नाहीतर जन्मा येऊन व्यर्थ आहे. एक क्षणभर तरी सेवकपणा अंगी बाणला तर त्यातले सुख खूप आहे असे तुकोबा या अभंगात सांगतात.

**पाईका विषयी तुकोबा म्हणतात –**

पाइकांनी पंथ चालविल्या वाटा। पारख्यांचा सांटा मोडोनियां ।1।
पारखिये ठायी घेऊनियां खाणे। आपले ते जन राखियेले ।2।
आधारेंविण जे बोलता चावळे। आपले ते कळे नव्हे एसें ।3।
सांडिता मारण मारिता पाईक। आणिकांसी शीक लागावया ।4।
तुका म्हणे विश्वा घेऊन विश्वास। पाईक तयास सुख देती ।5।

सेवकांनी शत्रूची ठिकाने मोडून काढून चांगले मार्ग निर्माण केले आहेत. शत्रूवर हल्ला करत त्यांनी लोकांचे रक्षण केले आहे. कुणी जर चुकीच्या मार्गाने गेले तर सेवक त्यांना शिक्षा करतात. कारण त्यामुळे दृष्टांना धडा मिळतो.
हा सेवक कसा असतो या संबंधी तुकोबा लिहतात –

पाईक तो प्रज्ञा राखोनियां कुळ। पारखिया मुळ छेदी दुष्टा ।1।
तो एक पाईक पाइकां नाईक। भाव सकळीक स्वामिकाजीं ।2।
तृणवत तनु सोनें ज्या पाषाण। पाइका त्या भिन्न नाही स्वामी ।3।
विश्वासावांचूनि पाइकासी मोल। नाही मिथ्या बोल बोलिलिया ।4।

**Please cite this Article as :** *संभाजी मलघे , तुकारामांचे पाईक अभंग : एक विचार* **: Indian Streams Research Journal (Oct. ; 2012)**

तुका म्हणे नये स्वामी उणेपणं। पाइका जतन करी त्यासी।5।

सेवक कसा असावा तर तो प्रजेचे रक्षण करणारा व शत्रूचा नाश करणारा. अशा सेवकाला स्वतःचा देह गवताप्रमाणे क्षुद्र वाटतो. त्याला सोने देखील दगडाप्रमाणे वाटते. अशा सच्च्या सेवकाला सर्वजन भिऊन असतात. त्यांचा गौरव सर्व प्रकारे होतो. सच्चेपणाने सेवा करणे हीच अशा सेवकांची कमाई असते.

पाइकपणें खरा मुशारा। पाईक तो खरा पाइकींने।1।
पाईक जाणे मारितें अंग।पाइकासी भंग नाहीं तया।2।
एके दोहीं घरी घेतले खाणें। पाईक तो पणे निवडला।3।
करूनि कारण स्वामी यश द्यावें।पाइका त्या नांव खरेपण।4।
तुका म्हणे ठाव पाइकां निराळा।नाही स्वामी स्छळा गेल्याविण।5।

मुशारा म्हणजे वेतन, सच्चेपणाने सेवा करणे हे पाइकाचे खरे वेतन आहे. सेवेच्या त्यागाने पाईक शोभून दिसतो. ज्या सेवकास लढाईचे अंग आहे. तोच सेवक गणला जातो. तुकाराम म्हणतात अशा स्वामिनिष्ठ पाइकांना परमेश्वराखेरीज दुसरे विश्रांतीचे ठिकाण नाही. या सेवकांचे श्रेष्ठ कनिष्ठ असे प्रकार देखील असतात –

उंच निंच कैसी पाइकाची ओळी। कोण गांढे बळी निवडिले।1।
स्वामिकाजीं एक सर्वस्वें तत्पर।एक ते कुचर आशाबध्द।2।
प्रसंगावांचूनि आणिती आविर्भाव।पाईक तो नाव मिरवीं वायां।3।
गणतीचे एक उंच निंच फार। तयांमध्ये शूर विरळा थोडे।4।
तुका म्हणे स्वामी जाणें त्याचा मान। पाईक पाहोन मोल करी।5।

कुणी भित्रे, कुणी शूर असतात, कुणी सेवेत तत्पर तर कुणी कुचराई करणारे असतात. काही शौर्य न दाखवता शूरत्वाचा खोटा अविर्भाव आणतात व आपण सेवक आहोत याची खोटी ऐट मिरवतात. असेच सेवक फार असतात खरा व प्रामाणिक एखादाच असतो. अशा प्रामाणिक व शूर सेवकाचा मान स्वामी राखतो.

एकाच स्वामीचे पाईक सकळ। जैसे बळ तैसे मोल तया।1।
स्वामिपहीं एकां ठाव उंच स्थळी। एक तो निराळी जवळी दुरी।2।
हीन कमाईचा हीन आन ठाव। उंचा सर्व भाव उंच पद।3।
पाईकपणे तो सर्वत्र सरता। चांग तरी परता गांढया ठाव।4।
तुझ म्हणे मरण आहे या सकळां। येणें अवकळा अभयें मोल।5।

एकाच देवाचे सर्व सेवक असले तरी त्याचे त्याचे मोल त्याच्या कर्तृत्वावर ठरते. जे खरे व प्रामाणिक असतात त्यांना उच्च स्थान मिळते आणि जे कमी प्रतीचे असतात त्यांना दुसऱ्या ठिकाणी जागा मिळते. परंतु एखादा चांगला असूनही कुचराईने काम करीत असेल तर तो भेकड आहे असे मानावे. तुकोबा म्हणतात मरण तर सर्वांनाच आहे मरणाचे भय बाळगल्यास अप्रतिश्ठा प्राप्त होईल. उलट मरणाचे भय न बाळगल्यास जीवनाचे मोल वाढेल.

तुकोबा पुढे म्हणतात –

प्रजी तो पाईक ओळीचा नाईक। पोटासाठी एकें जैशी तैसी।1।
आगळें पाऊल अणेकांसी तरी। पळती माघारी तोडीजेतीं।2।
पाठीवर घाय म्हणती फटमर। धडा अंगे शूर मान पावे।3।
घेईल दरवडा देहा तो पाईक। मारी सकळीक सर्व हरी।4।
तुका म्हणे नव्हे बोलाचे कांरण। कमाईचा पण सिध्दी पावे।5।

प्रजेच्या सेवेसाठी जो मरण देखील पत्करतो तोच खरा सेवक असतो. त्यांची थोरवी ही मोठी असते. जे केवळ पोटासाठी लढतात त्यांना मानही तसाच मिळतो. जे शूत्रूच्या भितीने माघारी वळतात ते भ्याड असतात त्यांना मान नसतो. आपल्या जिवावर उदार होऊन जो हल्ला करील त्याचाच जय होईल, त्याच्याच कार्याचे सार्थक होईल.

तुकारामांच्या पाईक अभंगाचे मोल भक्तीमार्गात मोठे मानले जाते. भक्तीमार्गात आपले सर्वस्व हे आपल्या स्वामीसाठी आहे ही प्रतिज्ञा सेवकाने घेतली गेली पाहीजे. समोरील बाणांचा, तोफेंच्या गोळयांचा वर्शाव छाती पुढे करून झेलणे, शत्रूच्या चोरवाटा शोधणे, आपले शरीर गवता प्रमाणे क्षुल्लक मानणे, सुवर्ण दगडा प्रमाणे माणून वागणे, आपल्या गुणवत्ते प्रमाणे पाईकाने सेवकांचा नाईक होणे, थोर प्रकारची सेवा हेच खरे वेतन माणने, शत्रूच्या पाठीवर शत्रूचे घाव घेवून पळून न येणे, सर्व धैर्य ऐकवटून शत्रूवर हल्ला करणे, सत्याने वागणे ही आदर्श पाईकाची लक्षणे तुकोबांनी पाईकांच्या या अभंगामधून सांगितली आहे.

***समारोप :–***

तुकोबांच्या पाईकांच्या अभंगामधून थोर शिपाई किंवा वीर पुरूष यांनी जीवनात कोणती वृत्ती धारण करावी या संबंधी विवेचन आले आहे. त्यांनी पाईकासाठी आपल्या अभंगामधून समर्पक असे विचार मांडले आहेत. त्यांचे पाईकाचे अभंग वारकारी संप्रदायात आजही मोलाचे आहेत.

*संदर्भ :–*

1.श्री.तुकाराम महाराजांच्या अभंगाची गाथा, भाग पहिला, मुंबई गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, विष्णू परशुराम शास्त्री पंडित,1950
2.सार्थ तुकाराम गाथा, खंड पहिला, प्रल्हाद नरहर जोशी, श्रीराम बुक डेपो ग्रंथ प्रकाशन, मुंबई. पहिली आवृत्ती 1966
3.सार्थ तुकाराम गाथा, खंड दुसरा, प्रल्हाद नरहर जोशी, श्रीराम बुक डेपो ग्रंथ प्रकाशन, मुंबई. पहिली आवृत्ती 1968
4.सार्थ तुकाराम गाथा, खंड तीसरा, प्रल्हाद नरहर जोशी, श्रीराम बुक डेपो ग्रंथ प्रकाशन, मुंबई. पहिली आवृत्ती 1969
5.प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, महाराष्ट्र साहित्य प्रकाशन, पुणे.
6.प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, ल.रा.नसिराबादकर
7.प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, ह.श्री.शिणोलीकर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net